सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
### माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३३/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. नितीन गोयल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त**
राज्यकर उप आयुक्त, मुंबई यांचे कार्यालय, उपनगरीय वस्तू व सेवाकर भवन,
वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा राज्य कर आयुक्त**
राज्यकर उप आयुक्त, मुंबई यांचे कार्यालय, उपनगरीय वस्तू व सेवाकर भवन,
वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०५.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १४.०५.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००३८७४ प्रकरणी आयोगाने दि.२६.१०.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकाऱ्यांनी, प्रथम अपील आदेशानुषंगाने दि. १९.११.२०१८ पर्यंत अपिलार्थींना निशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. या आदेशासह अपील अंशत: मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. ३३/२०१९ मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ३०.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी असे नमुद केले की, त्यांनी आयोगाचे आदेश दि. २६.१०.२०२८ च्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना दि.१५.०२.२०१९ रोजी माहिती देण्यात आली आहे व त्याबाबतचा अहवालही आयोगास दि. २३.०४.२०२९ रोजी पाठविलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०४.२०१९ रोजी आयोगास पाठविलेला अहवाल आयोगाच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाचे आदेश दि. २६.१०.२०१८ नुसार उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ३१.०५.२०२४**

State Information Commission Greater Mumbai

31-5-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**